अपर पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
सर पोचखानवाला रोड, वरळी, मुंबई–३०
दुरध्वनी क्र.– ०२२–२४९२१२१२, २४९२२६१८
Email - addlcpacbmumbai@mahapolice.gov.in
दिनांक :– ०९/०७/२०२४

**–: प्रेसनोट :–**

| | |
|---|---|
| ला.प्र.वि. | बृहन्मुंबई विभाग. |
| गुन्हा नोंद क्रमांक | २१/२०२४. |
| कलम | कलम ७ भ.प्र. अधिनियम १९८८. |
| आरोपी लोकसेवक | श्री. दिपक वामन बागुल, ५६ वर्षे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, टिळकनगर पोलीस ठाणे, मुंबई |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | रु. १,००,०००/- |
| तडजोडीअंती स्विकारलेली लाचेची रक्कम | रु. ३५,०००/- |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार यांनी त्यांच्या परिचयातील एका महिलेस त्यांच्या क्रेडिट सोसायटी द्वारे पैसे डबल करून देणार म्हणून रु. २७,५०,०००/- दिले होते. सदर महिलेने तक्रारदार यांना नमूद रक्कमे पैकी काही रक्कम परत केली असून उर्वरीत रक्कम रु. १७,५०,०००/- परत देण्यास टाळाटाळ करीत होत्या. म्हणून तक्रारदार व त्यांची पत्नी हया सदर महिलेच्या क्रेडिट सोसायटीचे कार्यालयात जावून उर्वरीत रक्कम देण्याबाबत विचारणा केली होती. सदर महिलेने टिळकनगर पोलीस ठाणे, मुंबई येथे जावून तक्रारदार यांच्याविरुध्द तक्रार दिल्याने टिळकनगर पोलीस ठाणेचे पोलीस कर्मचारी यांनी तक्रारदार यांना चौकशीकामी बोलावून वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. दिपक बागुल यांचेसमक्ष हजर केले होते. नमूदवेळी लोकसेवक यांनी तक्रारदार यांच्याकडे सदर महिलेकडून पैसे परत मिळवून देण्याकरीता रु. १,००,०००/- लाचेची मागणी केली. तक्रारदार यांना लोकसेवकास लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी दिनांक ०५/०७/२०२४ रोजी ला.प्र.वि. मुंबई येथे समक्ष हजर राहुन लोकसेवकाविरुध्द तक्रार दिली.<br>प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक ०५/०७/२०२४, ०६/०७/२०२४ रोजी पंचासमक्ष करण्यात आलेल्या पडताळणी दरम्यान लोकसेवक यांनी तक्रारदार यांना दिनांक ०८/०७/२०२४ रोजी येण्यास सांगितले होते. त्याप्रमाणे दिनांक ०८/०७/२०२४ रोजी पंचासमक्ष पुन्हा पडताळणी करण्यात आली असता, लोकसेवक यांनी तक्रारदार यांच्याकडे त्यांचे उर्वरीत पैसे नमूद महिलेकडून परत मिळवून देण्याकरीता तडजोडीअंती रु. ३५,०००/- लाचेची मागणी करून ती स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार तात्काळ करण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक यांनी लाचेची रक्कम स्विकारल्याने सदरहू रक्कम लोकसेवक यांच्या ताब्यातून हस्तगत करण्यात आली, म्हणून श्री. दिपक बागुल, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, टिळकनगर पोलीस ठाणे यांच्याविरुध्द ला.प्र.वि. मुंबई येथे भ्र.प्र. अधिनियम १९८८ कलम ७ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. |

मार्गदर्शन अधिकारी :-श्री. राजेंद्र सांगळे, अपर पोलीस उप आयुक्त, (अति. कार्यभार अपर पोलीस आयुक्त),लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

( नितीन दळवी )
सहाय्यक पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई बृहन्मुंबई विभागा तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभागाशी संपर्क साधावा.

संपर्क :- लाचलुचपत प्रतिबंधकविभाग, बृहन्मुंबई विभाग, ९१, सरपोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई.

**टोलफ्री क्र.** १०६४, दुरध्वनी क्र. ०२२-२४९२१२१२, फॅक्स क्र. ०२२-२४९२२६१८

**वेबसाईट** :– acbmaharashtra.gov.in, **ईमेल** :– acbwebmail@mahapolice.gov.in

**ईमेल** :– addlcpacbmumbai@mahapolice.gov.in

**फेसबुक** :– www.facebook.com - Maharashtra ACB

**मोबाईल ॲप** :– www.acbmaharashtra.net